पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
क्रं. मातंवि/११/कावि/७४/२०२२
दिनांक-३०/०६/२०२२

विषय- बायोमेट्रीक थम्ब/फेस रिडींग रजिस्ट्रेशनबाबत ...
संदर्भ- प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रशा/तप/१३/कावि/६२/२०१६
दि.०५/०५/२०१६.

परिपत्रक,

उपरोक्त संदर्भिय प्रशासन विभागाकडील परिपत्रकान्वये, महापालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांनी बायोमेट्रीक थंम्ब प्रणाली व्दारे हजेरी नोंदविणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच ज्या ठिकाणी अधिकारी / कर्मचारी यांची आस्थापना आहे, त्याच ठिकाणी त्यांचे थंम्ब असणे आवश्यक असलेबाबत नमुद केलेले आहे. तथापी माझे असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही कर्मचाऱ्यांचे त्यांचे आस्थापना विभागाव्यतिरिक्त इतर ठिकाणी रजिस्ट्रेशन करत आहेत. तरी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी अशा प्रकारे आपले आस्थापना असलेल्या विभागा व्यतिरिक्त इतरत्र ठिकाणी रजिस्ट्रेशन असल्यास दि.३० जुन, २०२२ पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत निरस्त करून घेण्यात यावे. तद् नंतर आस्थापनेव्यतिरिक्त इतर ठिकाणी थंम्ब/फेस रजिस्ट्रेशन आढळून आल्यास संबंधितांना प्रशासन विभागामार्फत योग्य ती कारवाई करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच या परिपत्रकान्वये सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविणेत येते की, ज्या अधिकारी/कर्मचारी यांना आस्थापना विभागाव्यतिरिक्त दुसऱ्या ठिकाणी चार्ज असल्यामुळे अथवा अन्य कारणास्तव दोन ठिकाणी थंम्ब/फेस रजिस्ट्रेशन करून पाहिजे असेल, त्यांनी अशा प्रकारचे परवानगी देण्याचे अधिकार फक्त प्रशासन विभागास असल्यामुळे सदरबाबत प्रशासन विभागाची परवानगी घेतल्यानंतर इकडील विभागाकडे आस्थापना विभागा व्यतिरिक्त दुसऱ्या ठिकाणी थंम्ब/फेस रजिस्ट्रेशन करणेबाबत पत्रव्यवहार करणेत यावा. अन्यथा त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत कोणतीही कार्यवाही करणेत येणार नाही.

त्याचप्रमाणे येथून पुढे अधिकारी/कर्मचारी यांचे थंम्ब रजिस्ट्रेशन करणेसाठी प्रशासन विभागाकडील नेमणूक आदेश/आस्थापना विभागाव्यतिरिक्त इतरत्र थंम्ब/फेस रजिस्ट्रेशन करणेबाबतचा आदेश व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या ओळखपत्राचे झेरॉक्ससह विभागप्रमुखांचे पत्र असल्याशिवाय थंम्ब/फेस रजिस्ट्रेशन करणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.

( विकास ढाकणे )
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

प्रति,

सर्व संबंधित विभाग

प्रत,

मे.इंन्दु सोल्युशन प्रा.लि., भोसरी.

Scanned with CamScanner